**प्रेसनोट** **दिनांक २४/११/२०२५**

**"डॉ. सदानंद भगवान काशिदे, वय ३८ वर्षे, वैद्यकिय अधिकारी, (वर्ग– २) प्राथमिक आरोग्य केंद्र, साकुर ता. जव्हार, जि.पालघर यांचेविरुध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल केलेबाबत "**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| **पो.स्टे./गुन्हा रजि.नं./कायदा व कलम** | पो.स्टे.जव्हार गु.रजि.नं.२७७/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा–१९८८ (सुधारीत अधिनियम–२०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | दि.२४/११/२०२५ चे १७:२५ वा. |
| **तक्रारदार** | महिला तक्रारदार वय.४७ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | **डॉ. सदानंद भगवान काशिदे वय ३८ वर्षे, वैद्यकिय अधिकारी, (वर्ग– २) प्राथमिक आरोग्य केंद्र, साकुर ता. जव्हार, जि.पालघर** |
| **आरोपी अटक** | लाच मागणीचा गुन्हा असल्याने भा.ना.सु.सं २०२३ चे कलम ३५ (३) अन्वये नोटीस. |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | रुपये ३०,०००/– तडजोडीअंती रुपये २५,०००/– |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | लाच मागणीचा गुन्हा. |

**थोडक्यात हकीगत:–** यातील तक्रारदार या जिजाऊ साकुर महीला मंडळाच्या अध्यक्षा असुन त्या त्यांचे महिला मंडळामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र, साकुर येथे गर्भवती महीला, स्तनदा माता, बालके यांना मानव विकास कार्यक्रम व कुपोषित बालकांचे शिबीर व इतर कार्यक्रमासाठी जेवण व्यवस्था करीत आहेत. त्यांनी पुरवठा केलेले जेवण्याचे बिल प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर येथुन वेळोवेळी चेकव्दारे मिळत असते.

तक्रारदार यांचे जिजाऊ साकुर महीला मंडळ मार्फत मे २०२५ पासून ते सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर येथे झालेल्या एकूण १० कॅम्प करिता पुरविण्यात आलेल्या जेवणाचे एकुण ८०,०००/– रुपये इतके बील झालेले होते.सदर रक्कमेचा चेक प्राथमिक आरोग्य केंद्र, साकुर यांचेकडुन मिळालेला आहे. त्यामधुन प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर येथील लोकसेवक आरोग्य अधिकारी डॉ.सदानंद काशिदे हे **मोबदला म्हणून रुपये ३०,०००/–** लाचेच्या मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि.पालघर युनिट यांच्याकडे तक्रार दिलेली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १३/१०/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक डॉ.काशिदे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे जेवणाचे बिलाचा चेक काढून दिल्याचा मोबदला म्हणून रु. ३०,०००/– पासुन सुरुवात करुन तडजोडीअंती रुपये २५,०००/– रक्कम लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना संपर्क न केल्याने लोकसेवक हे लाचेची रक्कम स्विकारणार नाही अशी तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांनी लाच मागणी केल्याचा गुन्हा दाखल व्हावा लेखी दिल्याने पालघर मधील पो.स्टे.जव्हार येथे गु.रजि.नं. २७७/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा–१९८८ (सुधारीत अधिनियम–२०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सापळा पथक – पोलीस निरीक्षक श्री.राकेश डांगे, पोहवा/विलास भोये, योगेश धारणे, प्रकाश दळवी, गीता कहार**
**तपास अधिकारी– पोलीस उप–अधीक्षक श्री.दादाराम करांडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर**

**मार्गदर्शक अधिकारी – मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता :–** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८, प्रशासकीय इमारत–'ब', जिल्हा मुख्यालय, पालघर–बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर. पिनकोड – ४०१४०४.
संकेतस्थळ :– https://www.acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोल फ्री नं. :– 1064
व्हॉट्सअॅप क्र. :– 8857971064 / 9769691064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297, 022-2081359, 022- 20813599
मोबाईल क्रमांक :– 8983217679/ 9004465175

**( दादाराम करांडे )**
पोलीस उप–अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर
मोबाईल नं.– 8983217679